# IVF : नातं की ॲडजस्टमेंट?



**डॉ. सारिका जुंजारे**
Sarikazunjare12@gmail.com

आई-वडील होणं हे सहजीवनातील सर्वात सुंदर आणि नैसर्गिक टप्प्यांपैकी एक. मात्र जेव्हा संतती प्राप्तीचा मार्ग सहजासहजी मिळत नाही, तेव्हा त्या जोडप्याच्या भावनिक, सामाजिक आणि मानसिक जगात अनेक सूक्ष्म हालचाली सुरू होतात. अशा वेळी आधुनिक वैद्यकशास्त्राने दिलेली आशा म्हणजे 'IVF' (In Vitro Fertilization) किंवा 'टेस्ट ट्यूब बेबी' होय. पण हे तंत्रज्ञान फक्त गर्भधारणा घडवून आणत नाही, तर दाम्पत्याच्या नात्यातील अनेक अदृश्य धाग्यांची चाचणीही घेत राहते. कारण आय.व्ही.एफ हा फक्त वैद्यकीय प्रवास नसतो; तो आत्मविश्वासाचा, सहनशक्तीचा, समजुतीचा आणि नात्यातील सामंजस्याचा एक खोल अनुभव असतो. हा केवळ विज्ञानाचा हस्तक्षेप नसून नात्याची परिपक्वता व मानसिक सशक्ततेची कसोटी ठरणारा प्रवास असतो.

## भावनिक वेदना

निसंतानत्वाच्या भावनिक वेदना या अत्यंत वैयक्तिक असतात, आणि त्याबद्दल समाजात अजूनही अनेक पुटपुटणारे, कधी कटाक्ष तर कधी दोषारोप करणारे आवाज अस्तित्त्वात असतात. त्यामुळे पहिली जखम शरीरातील नसते, ती मनातील असते. आणि त्या जखमेवर हळुवार हात ठेवून तिला भरून काढण्याचं मोठं कार्य दाम्पत्याला एकत्र करावं लागतं. आय.व्ही.एफ प्रक्रियेची सुरुवात होताच अनेक तपासण्या, इंजेक्शन्स, हॉस्पिटलचे वारंवार दौरे, कधी आर्थिक ताण, आणि सतत एक अदृश्य तणाव, तसेच; यश मिळेल का? या वेळेस जमेल का? अशा प्रश्नांनी मन व्यापून जातं.

या काळात नात्याची खरी परीक्षा सुरू होते. कारण पुरुष आणि स्त्री दोघांच्याही मनात गरज, अपराधीपणा, अपेक्षा, अपयश आणि आशा यांची जड-हलकी वादळं सतत उठत असतात. स्त्रीलाच उपचारांचा मोठा बोजा पेलावा लागतो, पण मनाचा भार दोघांचाही समानच असतो. अशा वेळी एकमेकांना दोष न देता, ''आपण दोघं मिळून हा प्रवास करत आहोत'' ही भावना जपली, तर नातं अधिक मजबूत होतं.

## माहितीचा महापूर

आधुनिकतेचा दुसरा पैलू म्हणजे या प्रक्रियेबद्दल उपलब्ध माहितीची भरपूरता. इंटरनेटवर, समाजात, नातेवाइकांमध्ये विविध मतमतांतरे ऐकू येत राहतात. त्यात अर्धवट ज्ञान, चुकीच्या समजुती किंवा अवास्तव अपेक्षा यामुळे मानसिक थकवा निर्माण होतो. त्यामुळे योग्य डॉक्टर, योग्य मार्गदर्शन आणि तितकीच भावनिक परिपक्वता या सर्वांचा समतोल आवश्यक ठरतो.

भावनिकदृष्ट्या, या प्रक्रियेत चढउतार खूप असतात. उपचाराच्या प्रत्येक टप्प्यावर आशा आणि भीतींचे दोरखे मनात ओढाताण करतात. यश मिळालं तर आनंद अवर्णनीय, आणि अपयश आलं तर निराशा खोल. मात्र दोन्ही प्रसंगांत नात्यातील धीर, संवाद, आणि परस्परावलंबन ही तीन महत्त्वाची दुवे टिकून राहिली तर दाम्पत्य अधिक मजबूत होतं. खरं पाहता आय.व्ही.एफ ही फक्त गर्भधारणेची प्रक्रिया नसून नात्याची नवीन बांधणी आहे.

## अनुभवाची सालंबी

गेल्या वीस वर्षांपासून वंध्यत्व तज्ज्ञ म्हणून काम करताना असंख्य दांपत्यांचा प्रवास जवळून पाहिलाय. बाळ नसलेल्या जोडप्यांमध्ये एक शांत संघर्ष असतो. त्यांच्या डोळ्यांतील बेचैनी, मनातील अपेक्षा, आणि दोघांमधील अव्यक्त ताण हे सगळं रोजच्या कामात मी अनुभवते. मातृत्व-पितृत्व ही नुसती जैविक गरज नसते; ती घराला घरपण देणारी, नात्यांना घट्ट करणारी, आणि जीवनाला नवीन रंग देणारी एक सुंदर ज्योत असते. बाळ झाल्यावर आयुष्य प्रत्यक्ष बदलतं, पण बाळासाठी केलेला प्रवास मात्र नात्यांमध्ये आणखी खोल जवळीक निर्माण करतो. या सर्व पार्श्वभूमीवर काही दांपत्य, नैसर्गिक प्रक्रियेत अडथळे आल्यास, आय.व्ही.एफ हा आधुनिक आणि सुरक्षित पर्याय स्वीकारतात.

## गैरसमजांचे ढग

टेस्टट्यूब बेबी किंवा आय.व्ही.एफ या संज्ञांवर आजही काही भागात गैरसमजांची सावली आहे. बाळ कृत्रिम असतं, त्यात शारीरिक दोष असतात, दुसऱ्याचे बीज वापरले जाते असे कित्येक काल्पनिक प्रश्न समाजात फिरत असतात. पण सत्य हे अगदी सोपं आहे,

होणारं बाळ पूर्णपणे नैसर्गिकच असतं. त्यात स्त्रीबीज आणि शुक्राणू दोन्ही नैसर्गिक असतात. फक्त गर्भधारणेसाठी आवश्यक वातावरण शरीरातून बाहेर उपलब्ध करून दिलं जातं. जगातील पहिली टेस्टट्यूब बेबी लुईस ब्राऊन आज चाळीस वर्षांची आहे आणि तिने स्वतः नैसर्गिकरीत्या दोन मुलांना जन्म दिला आहे. भारतातील पहिली टेस्टट्यूब बेबी हर्षाही आई झालेली आहे आणि तिचं बाळही नैसर्गिक आहे. विज्ञान प्रगत झालं, तसं मानवी आरोग्याच्या अनेक अडचणी आपण पार केल्या, मग मातृत्वाच्या अडचणी दूर करण्यासाठी विज्ञानाचा आधार का घेऊ नये?

तरीही ग्रामीण व निमशहरी समाजात IVF ही गोष्ट अजूनही सावधपणे, कधी भीतीने, तर कधी लज्जेने लपवली जाते. ''लोक काय म्हणतील?'' हा एकच प्रश्न अनेक दांपत्यांना आतून कुरतडत असतो. गर्भधारणा ही नैसर्गिक आनंदाची, घरभर साजरी होणारी गोष्ट असते; पण IVF केल्यानंतर ती गुपित बनते. काहींना तर अजूनही ''हे बाळ खरं झालंय का?'' असे नाजूक, दुखावणारे प्रश्न सहन करावे लागतात. काही वेळा तर महिला देखील स्वतःवरचा विश्वास गमावतात आणि मातृत्वाबद्दल अपराधीपणा मनाशी बाळगतात.

याच्या उलट चित्र मेट्रो शहरांमध्ये दिसतं. IVF ही कमकुवतपणाची नव्हे तर मॉडर्न, जागरूक, प्रगतिशील निर्णयाची खूण मानली जाऊ लागली आहे. करिअर महत्त्वाचं, आर्थिक स्थैर्य महत्त्वाचं, आणि नात्याचा प्रवास ठराविक प्लॅनप्रमाणे असावा अशी धारणा वाढली आहे. त्यामुळे काही दांपत्यं जाणूनबुजून गर्भधारणा पुढे ढकलतात आणि नंतर IVF ला ''सोप्पा पर्याय'' मानतात. काहीजणांसाठी तर तो एक प्रकारचा 'स्टेटस सिम्बॉल' बनू लागला आहे. निसर्गावर अवलंबून राहणं जुनाट, अनप्लान्ड वाटू लागलं; आणि विज्ञानावर पूर्णपणे अवलंबून राहणं आधुनिकतेचा भाग म्हणून



गौरवलं जात आहे. या दोन्ही टोकाच्या प्रवाहांत समाजात एक नवीन आणि चिंतनशील परिवर्तन शांतपणे आकार घेताना दिसतं.

## नवीन समीकरणं

काळाच्या ओघात आयव्हीएफ बाबतीत काही मूलभूत प्रश्न उभे राहतात. गर्भधारणा ही निसर्गाची सहज देणगी न राहता तांत्रिक उपलब्धता म्हणून पाहिली जाऊ लागली आहे का? बाळ ही प्रेमाची पावती नसून प्लॅनची पूर्तता बनत आहे का? नैसर्गिक गर्भधारणा आजच्या तरुणांसाठी जुनी वाटू लागली आहे का? आणि सर्वात नाजूक प्रश्न म्हणजे, पती-पत्नीतील प्रेमाची ऊब, त्यांची नैसर्गिक जवळीक, एकमेकांमधील भावनिक गुंतवणूक हे सगळं कमी होतंय का? की आधुनिकतेसोबत नात्यांची रचना देखील नव्याने घडत आहे?

काही दांपत्यांमध्ये शारीरिक संबंधांमध्ये अडचणी असतात. वेदना, भीती, लैंगिक आजार किंवा मानसिक दडपणामुळे ते एकमेकांच्या जवळ जाऊ शकत नाहीत. अशावेळी ते थेट IVF हा मार्ग निवडतात. पण इथे खरी गरज असते ती त्यांच्या नात्यातील अडथळे दूर करण्याची. कारण जर शारीरिक नात्यातील समस्या सोडवल्या, तर मनातील अंतर आपोआपच कमी होतं. बाळासाठीच्या प्रवासापेक्षा नात्यातील ऊब आणि संवाद महत्त्वाचा असतो. फक्त बाळ मिळवण्यापेक्षा दोन माणसं एकमेकांजवळ येणं हे अधिक आवश्यक असतं.

आजचं जग इन्स्टंट झालंय. बटन दाबलं की वस्तू मिळते, गाडी बुक केल्यावर काही मिनिटांत येते, आणि या सोयींचा प्रभाव गर्भधारणेवरही दिसू लागला आहे. दोन-तीन महिने प्रयत्न केले, आणि लगेच परिणाम न दिसला तर काही जोडपी IVF चा विचार करतात. काही जण तर ठराविक महिन्यात बाळ हवं असे ठरवून त्यानुसार प्रजननाचा वेळ ठरवतात. परंतु गर्भधारणा हा निसर्गाचा प्रवास आहे, त्याला कधी कधी वेळ लागतो, धीर लागतो, आणि भावनिक स्थैर्यही लागतं. चांगली गोष्ट म्हणजे IVF आणि सरोगसी संबंधित कायदे आता भारतात लागू झाले आहेत. त्यामुळे प्रणाली अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि नैतिक झाली आहे.

## प्रेमाला विज्ञानाचा हात

पती-पत्नी परस्परांचा आदर, प्रेम आणि समजून घेण्याची क्षमता असेल तर अपत्य असलं किंवा नसलं तरी जीवन सुंदरच असतं. अपत्य नाही म्हणून नातं अपूर्ण राहत नाही. आणि गरज पडल्यास दात्याकडून बीज किंवा भ्रूण घेणं, किंवा बाळ दत्तक घेणं यात काहीही गैर नाही. प्रेमाची व्याख्या फक्त स्वतःच्या बाळापर्यंत मर्यादित राहायला नको.

सेलिब्रिटी फरहा खान यांनी ४३ व्या वर्षी IVF द्वारे तिळं मुलांना जन्म दिला. त्यांच्या मुलाखतीतील एक वाक्य मात्र खूप खोलवर परिणाम करतं-''आज माझ्या मुलांकडे पाहताना मला प्राप्तीची भावना नाही; फक्त इतका कठीण काळ सहन केल्यानंतर मिळालेला अपार आनंद जाणवतो.'' हे वाक्य केवळ एका आईची भावना नाही, तर IVF प्रवासातून जाणाऱ्या प्रत्येक जोडप्याच्या मनाचं प्रतिबिंब आहे. त्यासाठीच असं वाटतं की IVF ही तडजोड नसून विज्ञान आणि आशेचा एक प्रेमळ हात आहे.


शेवटी, IVF म्हणजे नात्यातील कमकुवतपणा नव्हे. ते नात्याने घेतलेलं एक धैर्यशील आणि प्रेमपूर्ण पाऊल आहे. काही वेळा नातं मजबूत

असल्यावर गर्भधारणा होते, तर काही वेळा गर्भधारणेचा प्रवासच नातं अधिक मजबूत करतो. पण दोन्ही मार्गांचा केंद्रबिंदू एकच ते म्हणजे प्रेम. प्रश्न ''नातं की ॲडजेस्टमेंट?'' असा विचारला जातो; पण वास्तवात IVF हा नात्याला एक नवी दिशा देणारा, आशेचा उजेड पेटवणारा आधुनिक मार्ग आहे. नातं जपण्याचा, जगण्याचा आणि विस्तारण्याचा. प्रेमाला विज्ञानाची जोड मिळालं की ते अधिक शाश्वत, अधिक सुंदर आणि अधिक धैर्यवान होतं.

**(लेखिका : नांदेड येथील अंकुर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या संस्थापक संचालिका तथा अनुभवी आयव्हीएफ तज्ज्ञ असून, आई मी होणार या लोकप्रिय पुस्तकाच्या लेखिका आहेत.)**

❑

## काही राहिलं



कितीतरी लांब
चालायचं राहिलंय
निळाईच्या खोलीत
डुंबायचं राहिलंय

चिमुकल्यांच्या स्मितात
भगिनीच्या ओलाव्यात
भिजायचं राहिलंय / कितीतरी लांब

ज्ञानाच्या रोपाला
झालाय स्पर्श
गगनावरी वेलू
जायचा राहिलाय / कितीतरी लांब

झोपड्यांच्या जंगलात
वादळाच्या जोशात
मुसंडी मारून
बाहेर यायला
कळायचं राहिलंय / कितीतरी लांब

आसवांची भाषा
जगण्याची आशा
स्वतःला विसरून
वारकरी होऊन
झोकून द्यायला
शिकायचं राहिलंय / कितीतरी लांब

डोळ्यातले अश्रू
लांबून बघताना
मन घट्ट करायला
शिकायचं राहिलंय / कितीतरी लांब

**– डॉ. व्यंकटेश काब्दे, नांदेड**

SKM
SIDDHA AND AYURVEDA

CERTIFIED ISO 9001:2015 COMPANY
Good Manufacturing Practice Certification GMP Quality
TRADITIONAL 36 YEARS HEALTH & WELLNESS

Highly useful in the management of

**BONE AND JOINT HEALTH**






**CALCIUM FORTIFIED WITH**

- GLUCOSAMINE
- VITAMIN D3
- CISSUS QUADRANGULARIS (HADJOD)

**REDUCING RISK OF OSTEOPOROSIS**

**JOINT VITALISER & RESTORE MOBILITY**

**CARTILAGE REGENERATION & STRENGTH**

Super stockist : **RAJDEEP AYURVED** Shop No 4 Patiyala Complax Gurudwara Chowk, Nanded
**Mob. 9767644987, 9552754789**

**स्व.सौ. पार्वतीबाई बासरे स्मृती आरोग्य व्याख्यानमाला तप-पूर्ती सोहळा व वार्षिक अंकास आमच्या हार्दिक शुभेच्छा !**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्नित
महात्मा गांधी मिशन संचलित

# पत्रकारिता व माध्यमशास्त्र महाविद्यालय

विमानतळ रोड, नांदेड ■ मो. 95030 83573, 99235 50240



**कमलकिशोर कदम**
संस्थापक अध्यक्ष
महात्मा गांधी मिशन

- एम.जी.एम. संचलित पत्रकारिता व माध्यमशास्त्र महाविद्यालय हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न आहे.
- पदवी/बी.जे. ॲन्ड एम.एस. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष
- पदव्युत्तर एम.जे.ॲन्ड एम.एस. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्ष
- विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कार्य करने बंधनकारक राहील.



**अभ्यासक्रम निहाय विद्यार्थी संख्या व पात्रता**

| क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | माध्यम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| 1. | बी.जे.ॲन्ड एम.एस. | मराठी / इंग्रजी | 60 |
| 2. | एम.जे.ॲन्ड एम.एस. | मराठी / इंग्रजी | 30 |

**प्राचार्य :**
**डॉ. गणेश जोशी**
संपर्क : 99235 50240

**उपप्राचार्य :**
**डॉ. सेलूकर प्रविणकुमार**
संपर्क : 9860083573

**प्रा. राज गायकवाड** संपर्क : 9970355400 ■ **दिशा कांबळे** संपर्क : 9503083573